# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 13.03.2024** **वारः बुधवार**

---

1.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि मॉरीशसचे पंतप्रधान प्रवीन कुमार जुगनॉथ यांच्या उपस्थितीत आज शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा
2.पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरातमधीलच्या दोन सेमीकंडक्टर प्रकल्पांची पायाभरणी
3.भारतीय तटरक्षक दलाच्या कारवाईत पाकिस्तानी बोटीतून 480 कोटी रुपये किंमतीच्या अंमली पदार्थांचा साठा जप्त
4.24 भारतीय भाषांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान

**मॉरीशस दौरा**

भारत आणि मॉरीशस यांच्यातील शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि मॉरीशसचे पंतप्रधान प्रवीन कुमार जुगनॉथ यांच्या उपस्थितीत होणार आहे. या बैठकीत अनेक सामंजस्य करार आणि अनेक प्रकल्पांचे ई-उद्घाटन केलं जाईल.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अप्रवासी घाट आणि आंतरखंडीय गुलामगिरी संग्रहालयाला भेट देणार आहेत. हा घाट पोर्ट लुईस येथे स्थित आहे आणि हा 1849 मध्ये भारतासह इतर अनेक आफ्रिकन आणि आशियाई देशांमधून करारबद्ध कामगारांना आश्रय देण्यासाठी बांधलेले स्थलांतर शिबिर होते. 1987 मध्ये हे ठिकाण राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यात आलं आणि स्थलांतर शिबिराचे नाव बदलून आप्रवासी घाट असं करण्यात आलं. आंतरखंडीय गुलामगिरी संग्रहालय हे हजारो आफ्रिकन आणि आशियाई गुलामांच्या योगदानाचं स्मरणार्थ आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू गंगा तलावालाही भेट देणार आहेत. हे तलाव मॉरीशसच्या लोकांच्या, विशेषत: हिंदू समुदायाच्या जीवनात विशेष सांस्कृतिक, भौगोलिक, नैसर्गिक, धार्मिक आणि आध्यात्मिक महत्व आहे. महाशिवरात्रीच्या पवित्र आठवड्यात, विविध देशांमधून जवळपास चार लाख भाविक या ठिकाणी येतात.

**सेमी कंडक्टर प्रकल्प**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरातमधीलच्या दोन सेमीकंडक्टर प्रकल्पांची पायाभरणी दूरस्थ पद्धतीने करतील. यामध्ये गुजरातमधील धोलेरा विशेष गुंतवणूक क्षेत्रामधील सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन सुविधांचा समावेश आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेडद्वारे 91 हजार कोटी रुपयांच्या एकूण गुंतवणुकीसह स्थापन केली जाणारी, ही देशातील पहिली व्यापारी सेमीकंडक्टर फॅब असणार आहे.
साणंद इथल्या आउटसोर्स्ड सेमीकंडक्टर असेंबली आणि टेस्ट सुविधा ही सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेड द्वारे सेमीकंडक्टर असेंबली, टेस्टिंग, मार्किंग आणि पॅकेजिंग साठी सुधारित योजनेअंतर्गत स्थापित केली जाईल. या प्रकल्पात सुमारे साडेसात हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे.

**पंतप्रधान**

परदेशात भारतातील सेमी हायस्पीड रेल्वेची मागणी वाढेल आणि इथल्या रेल्वेच्या कारखान्यांना अधिक काम मिळेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. रेल्वेच्या विविध उपक्रमांची पायाभरणी तसंच लोकार्पण काल पंतप्रधानांच्या उपस्थितीत झालं त्यावेळी ते बोलत होते. काल पायाभरणी आणि लोकार्पण झालेल्या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्रातल्या 506 प्रकल्पांचा समावेश आहे. मुंबई सेंट्रल स्थानकावर झालेल्या कार्यक्रमाला राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित होते. एक स्थानक एक उत्पादन योजना आणि एकता मॉलच्या माध्यमातून स्थानिक कारागिरांच्या उत्पादनांना प्रोत्साहन मिळत आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

रेल्वेच्या पुणे विभागातल्या 22 ठिकाणच्या रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन पंतप्रधानांच्या दूरस्थ उपस्थितीत झालं. यामध्ये पुण्यातल्या घोरपडी इथल्या वंदेभारत रेल्वे कोच देखभाल, दुरुस्ती कारखान्याची पायाभरणी, पिंपरी स्थानकातल्या जन औषधी केंद्राचं उद्घाटन, पुणे मिरज दुहेरी मार्गाचं लोकार्पण, फलटण बारामती नवीन मार्गिकेच्या कामाचा प्रारंभ करण्यात आला. तसंच पिंपरी, चिंचवड, तळेगाव, शिवाजीनगर, कोल्हापूर, मिरज आणि सांगली स्थानकात एक स्थानक एक उत्पादन दुकानांचं उद्घाटन झालं.

**अमितशाह-सहकारीसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते नवी दिल्लीत आज तीन बहुराज्यीय सहकारी संस्थांच्या नवीन कार्यालयीन इमारतींचं उद्घाटन होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या "सहकारातून समृद्धी" या संकल्पनेला साध्य करण्याच्या दृष्टीनं एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून या इमारतींचं उद्घाटन होत असून यामध्ये भारतीय बीज सहकारी समिती मर्यादित (BBSSL), राष्ट्रीय सहकारी ऑरगॅनिक्स मर्यादित (NCOL) आणि राष्ट्रीय सहकारी निर्यात मर्यादित (NCEL) या तीन संस्थांचा समावेश आहे.

**प्रसार भारती**

देशभरात परवडणाऱ्या आणि सुलभ डिजिटल सेवांचा प्रसार करण्यासाठी दूरसंचार विभागांतर्गत युनिव्हर्सल सर्व्हिस ऑब्लिगेशन फंड (USOF) नं काल प्रसार भारती आणि डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्कसोबत त्रिपक्षीय सामंजस्य करार केला. देशातल्या ग्रामीण भागासाठी ओटीटी आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मसह ब्रॉडबँड सेवा एकत्रित करणं हा या कराराचा उद्देश आहे. या करारामुळं दुरचित्रवाणी वाहिन्यांचं थेट प्रसारण आणि मागणीनुसार नवीन कार्यक्रम तयार करण्यासह ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रसारित होणारी सामग्री  प्रसारभारती तयार करू शकणार आहे.

**स्टेटबँक**

भारतीय स्टेट बँकेनं काल निवडणूक आयोगाकडं सर्व निवडणूक रोख्यांची माहिती सादर केली आहे. याआधी ही माहिती देण्यासाठी 30 जूनपर्यंत मुदतवाढ मिळावी अशी मागणी स्टेट बँकेनं सर्वोच्च न्यायालयाला केली होती,मात्र न्यायालयानं ही विनंती फेटाळून लावत निवडणूक रोख्यांचा तपशील तात्काळ जाहीर करण्यास सांगितलं होतं. तसंच 15 मार्चला संध्याकाळी पाच वाजेपर्यंत  राजकीय पक्षांच्या  निवडणूक रोख्यांचे हे सर्व तपशील बँकेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यास सर्वोच्च न्यायालयानं सांगितलं आहे. निवडणूक रोखे योजना सर्वोच्च न्यायालयानं 15 फेब्रुवारी रोजी रद्द केली आहे.

**हरियाणा मुख्यमंत्री**

राज्याच्या विकासासाठी काम करणार असल्याचं हरियाणाचे नवे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी म्हटलं आहे. आपल्याला दिलेल्या नव्या जबाबदारीबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, पक्षाध्यक्ष जेपी नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पक्षाच्या इतर वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत. राज्यपालांना ४८ आमदारांचा पाठिंबा असल्याची माहिती देण्यात आली आहे. भाजपचे 41 आमदार असून इतर 6 अपक्ष आमदारांनी सरकार स्थापनेसाठी भाजपला पाठिंबा दिला असल्याचं त्यांनी सांगितलं.

**भारतीय तटरक्षकदल**

भारतीय तटरक्षक दलानं गुप्तचर माहितीच्या आधारे केलेल्या संयुक्त कारवाईत काल सुमारे 480 कोटी रुपये  किंमतीच्या अंमली पदार्थांचा साठा असलेली एक पाकिस्तानी बोट पकडली.ज्यामध्ये सहा जणांचा समावेश आहे. अंमली पदार्थ नियंत्रण संस्था आणि गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाच्या मदतीनं भारतीय तटरक्षक दलानं पोरबंदरपासून अरबी समुद्रात सुमारे 350 किलोमीटर अंतरावर ही कारवाई केली,असं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या बोटीत 80 किलो अंमली पदार्थांचा साठा सापडला असून पुढील तपासासाठी ही बोट पोरबंदरला आणण्यात आली आहे.अंमली पदार्थ नियंत्रण संस्था,गुजरातचं दहशतवाद विरोधी पथक आणि भारतीय तटरक्षक दलानं गेल्या तीन वर्षात तीन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे 517 किलो अंमली पदार्थ जप्त केले असून तीन वर्षातली कालची दहावी कारवाई आहे.

**परराष्ट्रमंत्री**

परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस.जयशंकर यांनी काल नवी दिल्लीत न्यूझीलंडचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री विन्स्टन पीटर्स यांची भेट घेतली.या भेटी दरम्यान राजकीय, व्यापार,आर्थिक, सुरक्षा, गतिशीलता, शिक्षण  आदी  विषयांवर सकारात्मक चर्चा झाल्याचं डॉक्टर एस.जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील संदेशात सांगितलं आहे.यावेळी आंतरराष्ट्रीय सौर आघाडीत सामील झाल्याबद्दल एस.जयशंकर यांनी न्यूझीलंडचं स्वागत केलं, तसंच  त्यांनी राष्ट्रकुल आणि  संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणांबाबतच्या सहकार्यावर चर्चा केली.इंडो-पॅसिफिक आणि जागतिक मुद्द्यांवरही  दोन्ही नेत्यांनी या भेटी दरम्यान सविस्तर चर्चा केली.

बेकायदेशीर संघटना

केंद्र सरकारनं जम्मू आणि काश्मीर नॅशनल फ्रंटला तात्काळ प्रभावानं पाच वर्षांसाठी बेकायदेशीर संघटना म्हणून घोषित केलं आहे. ही संघटना जम्मू-काश्मीरला भारतापासून वेगळं करण्यासाठी फुटीरतावादी कारवाया करत असल्याचं आढळलं असून राष्ट्राच्या सार्वभौमत्व, सुरक्षा आणि अखंडतेला आव्हान देणारी ही संघटना दहशतवादाचं समर्थन करते,असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. केंद्र सरकार देशातील लोकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि दहशतवादी शक्तींचा नायनाट करण्यासाठी कटिबद्ध आहे,असंही अमित शाह यांनी म्हटलं आहे.

24 भारतीय भाषांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या नामवंत लेखकांना 2023 चे साहित्य अकादमी पुरस्कार काल नवी दिल्लीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यात प्रत्येक लेखकाला एक लाख रुपये रोख रक्कम आणि भारतीय साहित्यातील त्यांच्या अमूल्य योगदानासाठी  सन्मानपत्र प्रदान करण्यात आलं. प्रसिद्ध लेखक, कादंबरीकार कृष्णात खोत यांना 'रिंगाण' या कादंबरीसाठी मराठी भाषेसाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आला तर प्रख्यात कोंकणी लेखक, कवी, अनुवादक प्रकाश एस पर्येंकर यांनाही 'वर्सल' या लघुकथा संग्रहासाठी साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवण्यात आलं. प्रमुख अतिथी, ओडिया भाषेतील प्रख्यात लेखिका प्रतिभा राय यांनी विविध भाषिक साहित्यिकांची आणि त्यांच्या साहित्य कौशल्याची यावेळी प्रशंसा केली.

**रणजी**

मुंबई संघानं रणजी करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विदर्भ संघासमोर 538 धावांचे मोठं लक्ष्य ठेवलं आहे. वानखेडे स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत मुंबईच्या मुशीर खानने 136 धावांची जबरदस्त खेळी केली तर श्रेयस अय्यरने 95 धावा केल्या. कर्णधार अजिंक्य रहाणेनेही 73 धावांची यशस्वी खेळी केली. मुशीर खान रणजी ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात शतक झळकावणारा सर्वात तरुण फलंदाज ठरला आहे. त्याने सचिन तेंडुलकर यांचा 29 वर्षांचा विक्रम मोडीत काढला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.